# महाराष्ट्र शासन

## सह संचालक (उच्च शिक्षण)

पुणे विभाग, १७ डॉ.आंबेडकर रोड, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र.०२०/२६१२७८३३ फॅक्स क्र.०२०/२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/१.१०.१७/पदे अनुज्ञेयता/२०१८ ३०४४ (पी.३२) दि.२१/१२/२०१८

प्रति,

प्राचार्य,

**आय.एल.एस. विधी महाविद्यालय,**

पुणे-४११००४.

**विषय:-** **दि.१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर शिक्षक व शिक्षकेतर पदांची अनुज्ञेयता...**

संदर्भ:-
१) शासन निर्णय, क्र.युएसजी-११७८/२५२५१/XXXII सेल, दि.१९/०६/१९७८.
२) शासन निर्णय, क्र.एनजीसी/२०८०/१६०२८४/(५९८७)युएनआय-२, दि.०१/०६/१९८१.
३) शासन निर्णय, क्र.एनजीसी/१२८६/१२२४/युएनआय-४, दि.२७/०२/१९८९.
४) शासन निर्णय, क्र.बीजीटी-१०९७/प्र.क्र.२४/अ/अर्थसंकल्प-१९, दि.१५/१२/१९९८.
५) शासन निर्णय, क्र.युएसजी-१४९३/(२६)/मशि-१, दि.१७/०५/१९९४.
६) शासन निर्णय, क्र.एनजीसी-२२९९/(४७९५)/विशि-४, दि.२६/०८/१९९९.
७) शासन निर्णय, क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०/०९/२००१.
८) शासन निर्णय, क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९(भाग-३)/२००२/वित्तीय सुधारणा, दि.०९/०१/२००३.
९) शासन निर्णय, क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०१/०७/२००४
१०) शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१२७/०७/१२, दि.२७/०८/२००७.
११) शासन परिपत्रक, क्र.एनजीसी-२०१०/(प्र.क्र.४१५/१०)/विशि-१, दि.०७/०९/२०११.
१२) शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०११/(४०४/११)/विशि-१, दि.१९/१०/२०११.
१३) शासन निर्णय, क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि-५, दि.०३/११/२०१८.
१४) मा.संचालनालयाकडील क्र.अशाम/२०१७/महा.पदांचा आढावा/मवि-१/१९८५४, दि.१२/१२/२०१८.
१५) मा.संचालनालयाकडील क्र.अशाम/२०१७/महा.पदांचा आढावा/मवि-१/२००२७, दि.१४/१२/२०१८.
१६) आपला दि. / / रोजीचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१६ अन्वये प्राप्त झालेला आपल्या महाविद्यालयाच्या प्रस्तावानुसार दि.०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर विद्याशाखा, विषय, अभ्यासक्रमनिहाय कार्यभार तपासण्यात आला. कार्यभार परिगणना मानकांनुसार शासनाने विहीत केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने खालील अटींच्या अधीन राहून महाविद्यालयासाठी शिक्षक / शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्यात येत आहेत.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि-५, दि.०३/११/२०१८ नुसार पदांची अनुज्ञेयता दि.०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार आधारीत आहे. मात्र, आकृतिबंध अंतिम झालेला नसल्याने, आकृतिबंधास वित्त विभागाची अंतिम मंजूरी मिळेपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत. प्रस्तूत बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

**शिक्षकीय पदे**

| अ.क्र. | विषय/पदनाम | २०१७-१८ चा एकूण कार्यभार | सन २०१७-१८ | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | |
| १ | प्राचार्य | ६ | १ | १ | ० | विधी |
| २ | ग्रंथपाल | - | १ | ० | १ | |
| ३ | शा.शि.संचालक | - | ० | ० | ० | |
| १ | इंग्रजी | | | | ० | |
| २ | मराठी | | | | ० | |
| ३ | हिंदी | | | | ० | |
| ४ | संरक्षणशास्त्र | | | | ० | |
| ५ | संस्कृत | | | | ० | |
| ६ | उर्दू | | | | ० | |
| ७ | इतिहास | | | | ० | |
| ८ | अर्थशास्त्र व बँकींग | | | | ० | |
| ९ | राज्यशास्त्र | २४ | १ | ० | १ | |
| १० | गृहशास्त्र | | | | ० | |
| ११ | तत्वज्ञान | | | | ० | |
| १२ | तर्कशास्त्र | | | | ० | |
| १३ | विधी | ५६० | १९ | ८ | ११ | ५-अर्धवेळ (जुने |
| १४ | रसायनशास्त्र | | | | ० | |
| १५ | पदार्थविज्ञान | | | | ० | |
| १६ | वनस्पतीशास्त्र | | | | ० | |
| १७ | प्राणीशास्त्र | | | | ० | |
| १८ | संख्याशास्त्र | | | | ० | |
| १९ | गणित | | | | ० | |

INDIAN LAW SOCIETY PUNE-4

ILS LAW COLLEGE PUNE-4

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | भूगर्भशास्त्र | | | | ० | |
| २१ | इलेक्ट्रॉनिक्स | | | | ० | |
| २२ | सूक्ष्मजीवशास्त्र | | | | ० | |
| २३ | भूगोल | | | | ० | |
| २४ | मानसशास्त्र | | | | ० | |
| २५ | शिक्षणशास्त्र | | | | ० | |
| २६ | समाजशास्त्र | | | | ० | |
| २७ | पर्यावरणशास्त्र | | | | ० | |
| २८ | अरेबिक | | | | ० | |
| | **एकूण** | **५९०** | **२२** | **९** | **१३** | |

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील (अनुदानित) विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे:-

| | कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय | | विज्ञान विद्याशाखेतील विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी संख्या | | विद्यार्थी संख्या |
| (कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयास संलग्नित असल्यास) | कनिष्ठ महाविद्यालय | ० | कनिष्ठ महाविद्यालय | ० |
| | वरिष्ठ महाविद्यालय | १५१३ | वरिष्ठ महाविद्यालय | ० |
| | एकूण | **१५१३** | एकूण | **०** |

**शिक्षकेतर पदे**

| अ.क्र. | पदनाम | अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रबंधक | ० | ० | ० | |
| २ | अधिक्षक | १ | ० | १ | |
| ३ | मुख्य लिपीक | १ | १ | ० | |
| ४ | कनिष्ठ लघुलेखक | १ | १ | ० | |
| ५ | सहाय्यक ग्रंथपाल | १ | १ | ० | |
| ६ | वरिष्ठ लिपीक | २ | ० | २ | |
| ७ | कनिष्ठ लिपीक | ४ | २ | २ | |
| ८ | प्रयोगशाळा सहाय्यक | ० | ० | ० | |
| ९ | ग्रंथालय लिपीक | १ | ० | १ | |
| १० | ग्रंथालय परिचर | ५ | १ | ४ | |
| ११ | प्रयोगशाळा परिचर | ० | ० | ० | |
| १२ | शिपाई | ६ | ३ | ३ | |
| | **एकूण** | **२२** | **९** | **१३** | |

**अटी व शर्ती:-**

१) प्रस्तुतची पदे महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या अनुदानित विद्याशाखा / तुकडया / विषय यामधील प्रवेशित विद्यार्थी संख्या विचारात घेऊन परिगणीत होणाऱ्या कार्यभारानुसार अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत.

२) महाविद्यालयाने पदनिश्चितीसाठी सादर केलेल्या प्रस्तावात नमुद केलेल्या विद्याशाखा/ तुकडया/ विषय व विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या विद्यार्थीसंख्येची प्रत्यक्ष महाविद्यालयात पटनोंदणी अनिवार्य राहील.

३) अनुदान पात्रतेसाठी अनिवार्य असलेली विद्यार्थीसंख्या विचारात घेऊन कार्यभार परिगणना करण्यात आलेली आहे.

४) प्रात्यक्षिकांसाठी शासन नियमानुसार विहित केलेल्या विद्यार्थी संख्येची बॅच (गट) अनिवार्य राहील.

५) व्याख्याने / प्रात्यक्षिके/ ट्युटोरियल ( पाठनिर्देशन), प्रोजेक्ट वर्क ( प्रकल्प कार्य) या करिता नमुद असणाऱ्या तासिका शासनाने विहीत केलेल्या निकषानुसार बंधनकारक राहतील.

६) महाविद्यालयास अनुज्ञेय करण्यात आलेल्या पदांनुसार शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार विहीत प्राधिकाराकडून आरक्षण बिंदू नामावली प्रमाणित करणे अनिवार्य आहे.

७) पुढील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थीसंख्येत घट झाल्यास किंवा अन्य कारणास्तव अनुदानित विभागातील कार्यभार कमी झाल्यास अनुज्ञेय पदसंख्या कमी करण्यात येईल.

८) अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजनाबाबत प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समावेशन झाल्याशिवाय पदभरतीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

९) महाविद्यालयाच्या अनुदान पात्र कार्यभारावर आधारीत पदे अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत. अनुज्ञेय पदांवरील पदभरतीसाठी स्वतंत्रपणे शासनाच्या प्रचलित धोरण व कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव सादर करुन ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

१०) अनुज्ञेय पदावरील पदभरती शासनाच्या प्रचलित पदभरती धोरणानुसार पूर्वपरवानगी शिवाय (ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय) पदभरती करण्यात येऊ नये. शासन परवानगीशिवाय विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन न करता नियुक्त्या केल्यास / नियुक्तीबाबत कोणत्याही स्तरावर अनियमितता आढळून आल्यास सदर पदावरील वेतन अदायगी अमान्य केली जाईल. अशा नियुक्त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यवस्थापन व महाविद्यालय यांची राहील. . .

(... नारखेडे)
... (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१
Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info
फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.शिससं/उशि/पुवि/(६७३०/२२)/पदवाटप/२०२२ /3231 दि.३१-१०-२०२२

प्रति,
प्राचार्य,
आय.एल.एस. विधी महाविद्यालय,
पुणे-४११ ००४.

विषय:- सहाय्यक प्राध्यापक पदभरतीबाबत...

संदर्भ:- १) शासन निर्णय, क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि-५, दि.०३-११-२०१८.
२) या कार्यालयाकडील पत्र क्र.ससं/उशि/पुवि/१.१०.१७/पदे अनुज्ञेयता/२०१८/३०४४ (पी.३२), दि.२१-१२-२०१८.
३) या कार्यालयाकडील क्र.JDHEPune/POST/२०१९/१२, दि.२९-०१-२०१९.
४) आपलेकडील क्र.एलसी/१२०/२०२२, दि.२१-१०-२०२२.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भात दि.०१-१०-२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभूत माणून ग्राहय धरण्यात आल्यानुसार संदर्भ क्र.३ अन्वये एकूण २० अनुज्ञेय पदे विचारात घेऊन आपल्या महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक पदभरतीस ०८ पदभरतीस मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

तथापि, संदर्भ क्र.४ अन्वये आपण एकूण २० अनुज्ञेय पदांमध्ये ०५ अर्धवेळ पदांचा समावेश झाल्याने एकूण १५ अनुज्ञेय पदे विचारात घेऊन पदभरतीस मान्यता ही ०८ ऐवजी ०४ पदावर देणे आवश्यक आहे, असे कळविले आहे.

याबाबत आपण कळविल्यानुसार आपणांस सहाय्यक प्राध्यापक पदभरतीसाठी ०८ ऐवजी ०४ पदे भरण्यासाठी बिंदूनामावलीमध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन, ०४ सहाय्यक प्राध्यापक पदभरतीसाठीचा प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन तात्काळ सादर करावा.

(डॉ.किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

प्रत:-
१) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), पुणे विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-४११ ००१.
३) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (आरक्षण कक्ष), पुणे-४११ ००७.

INDIAN LAW SOCIETY PUNE-4

**महाराष्ट्र शासन**
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण ), पुणे विभाग, पुणे
रोझरी शाळा- (लाल देवळा समोर), 17 -बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे पिन कोड 411 001

**जा. क्र.- JDHEPune/POST/2019/12** **दिनांक - 29.01.2019**

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव / प्राचार्य,**
Indian Law S0ciety
I.L.S. Law C0llege, Pune

**विषय : अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक 01.10.2017 अखेरचा शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आढावा.**

**संदर्भ : -**
1. शासनाच्या समक्रमांकाच्या दि.20.11.2018, दि.04.12.2018 व दि. 01.01.2019
2. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक आढावा-1513/प्र.क्र.125/म.शि.5 दि.03.11.2018
3. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक बीएड-4615/प्र.क्र.208(1)/मशि-2 दि.03.12.2018
4. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-2018/प्र.क्र.324/मशि-5 दि. 18.12.2018

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्रमांक 2 येथील शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथील करण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने दिनांक 01.10.2017 च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभूत मान्‍ग्राह्य धरण्यात आली आहेत. त्यानुसार पदे वाटप करण्यात आली असुन आपल्या महाविद्यालयास खालीलप्रमाणे पदवाटप करण्यात आली आहेत.

| अ.क्र | पदनाम | अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | पदभरतीस मान्यता देण्यात आलेली संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सहा. प्राध्यापक | 20 | 8 | 12 | 8 |

**उपरोक्त पदे खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन वाटप करण्यात आलेली आहे :-**

अ) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध निश्चित करण्याच्या अनुषंगाने उच्चस्तरीय सचिव समीतीने काही बाबींची पुर्तता करण्याचे निर्देश दिलेले असल्याने, अद्याप आकृतीबंध निश्चित झालेला नाही. त्यामुळे पद भरतीवरील निर्बंध शिथील करुन उपरोक्त प्रमाणे पद भरतीस मान्यता देताना दिनांक 01.10.2017 च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभूत मानूनग्राह्य धरण्यात आली आहेत. मात्र आकृतीबंध अंतिम झालेला नसल्याने आकृतीबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येऊ नयेत.

आ) मान्यता दिलेल्या शिक्षकीय पदांची पदभरती करताना प्रत्येक महाविद्यालयास संबंधीत विद्यापीठ / नियामक प्राधिकरणाने दिलेली संलग्नता (Affiliation) अबाधित राहण्यासाठी तसेच महाविद्यालयाचे मूल्यांकन (Accreditation) व पुर्नमूल्यांकन (Reaccreditation) होण्याकरिता आवश्यक असलेली मर्यादा विचारात घेऊनच शिक्षकीय पदांचे सर्व महाविद्यालयांना समान वाटप करण्यात आलेले आहे.

इ) यासंदर्भात अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पदांच्या आढाव्याची कार्यवाही सुरु असुन अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर शासनाच्या धोरणानुसार उर्वरित पदभरती संदर्भातील निर्णय कळविण्यात येईल.

ई) नमुद मर्यादेपेक्षा अधिकची पदे कोणत्याही परिस्थितीत भरण्यात येऊ नयेत. याबाबतची तक्रार दाखल झाल्यास तसेच तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास प्राचार्य यांना सर्वस्वी जबाबदार राहतील याची दक्षता घेण्यात यावी.

उ) ्नामावलीनुसार आरक्षण निश्चित झाल्यानंतर वाटप केलेल्या पदसंख्येनुसार पदभरतीस ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीवर आवश्यक . माहीती भरुन ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदर पदभरती करताना शासनाच्या दिनांक 03.11.2018 च्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

ऊ) ाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 चे कलम 105 (9) अनुसार अतिरिक्त अनुदानित व्यक्तीचे समावेशन केल्याची खात्री केल्यानंतरच ना-हरकत प्रमाणपत्रा. . प्रस्ताव सादर करण्यात यावा. उपरोक्त मुद्दयानुसार ना-हरकत प्रमाणपत्राकरिता प्रस्ताव सादर करतांना अतिरिक्त व्यक्तीचे समावेशन करण्यात आले असल्याचे / नसल्याचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

Sign
विभागीय सहसंचालक ( उ.शि. )
पुणे विभाग

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

INDIAN LAW SOCIETY ★ PUNE-4 ★